# सांस्कृतिक वारसा जोपासणारे नगरपालिका नगरवाचनालय, कराड

**अरूणा मधुकर वाघमारे**

इतिहास अधिविभाग, संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

***सारांश :***

१५५ वर्षाची परंपरा जपणारे हे नगरवाचनालय आज कराड शहराची शान बनले आहे. बुध्दीवंतांची गरज तर वाचनवेडया पुस्तकप्रेमी वाचकांची तहान भागविण्याचा झरा बनले आहे. तसचे विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच त्यांच्या अंगी असणा—या विविध कलागुणांना वाव देणारे एक अभूतपूर्व मंच म्हणूनही याचे योगदान महत्वपूर्ण आहे. अतिशय नियोजनबध्द व सातत्याने चालविल्या जाणा—या या व्याख्यानमालामध्ये आजपर्यंत अनेक ख्यातनाम कीर्तीवंत व्याख्याते आमंत्रित केले आहेत. याला रसिकजनांचाही अतिशय मोठा प्रतिसाद असतो. या लोकप्रिय व मनपसंद अशा व्याख्यानमालेत आपल्याला एक तरी विचारपुष्प गुंफता यावे यासाठी व्याख्याते प्रयत्नशील असतात. त्यामुळे या व्याख्यानमालेस विचारवंतांची उणीव कधीच भासली नाही.

***प्रस्तावनाः***

कोणत्याही गावाची ओळख ही त्या गावात जन्म घेऊन अलौकिक कार्य करणा—या व्यक्तींमुळे तर होतेच पण त्या गावच्या शैक्षणिक, क्रीडा, कृषी, राजकीय तसेच सांस्कृतिक वाटचालीमुळेही होते. कराड शहराला प्राचीन कालखंडापासून एक मोठा इतिहास आहे. हे एक तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळे येथील संस्कृतीचे जतन करणे, क—हाडचा इतिहास संस्कृती तसेच कला संवर्धन या सर्व गोष्टींना आठवणीचे स्मारक करून आपल्या उदरात सामावून घेण्याची किमया वाचनालयाने केली आहे.क—हाड व आसपासच्या परिसरातील लोकांनी शिक्षणाच्या माध्यमातून क—हाड नगरीला विद्यानगरीचे रूप प्राप्त करून दिले आहे. तेथील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारी व्याख्यानमालेची परंपरा तसेच मानवी जवीनाचा अविभाज्य अंग असणा—या वाचन संस्कृतीची जोपासना करण्याचा अविरत प्रयत्न केला जातो. वाचन म्हणजे केवळ विरंगुळा नव्हे तर ज्ञानवृध्दीचे ते एक महत्वूपर्ण दालन आहे. लोकांच्या मनामध्ये वाचनाची आवड निर्माण करणारे व आजच्या टी. व्ही. मोबाईलच्या आक्रमणातूनही लोकांना वाचनाची आवड जोपासण्यास अतिशय उत्तम प्रकारे मदत करणारे कराड शहरातील नगर वाचनालय हे या शहराच्या सांस्कृतिक प्रगतीत मोलाची भर टाकण्यात अग्रगण्य भूमिका बजावत आहे.

**कराडचे नगरवाचनालय —**

या नगरवाचनालयाची स्थापना सन १८५७ ची ‘नेटिव्ह जनरल लायब्ररी’ या नावाने सुरू करण्यात आलेले हे वाचनालय सुरूवातीला लोकवर्गणीतून चालविले जात होते. अखंड भारताच्या दृष्टीने ऐतिहासिक व संस्मरणीय अशा सन १८५७ च्या वर्षात सुरू झालेल्या या नगरवाचनालयाने दि. १५ सप्टेंबर १८५५ ते १९५५ मध्ये आपला शतसांवत्सरिक महोत्सव उत्साहाने साजरा केला.[१]

दरम्यान एकीकडे कराड शहर शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि व्यापारी स्तरावर वेगाने धाव घेत असताना मात्र शहरातील चावडी चौकातील चावडीच्या पडक्या, अपु—या आणि अडचणीच्या जागेत कसाबसा खर्च उचलत, पेलत हे वाचनालय सन १९५२ पर्यंत बाल्यावस्थेत उभे होते. शेवटी सन १९५२ मध्ये वाचनालयरूपी हे बाळ नगरपालिकेच्या ओटीत देण्यात आले. तेंव्हा फक्त ४३० फाटकी पुस्तके एवढीच शिदोरी या वाचनालयात होती .

परंतु, त्यावेळेच सकाळचे बातमीदार श्री. म. कुलकर्णी, शिवाजी शिक्षण संस्थचे संस्थापक शंकरराव करंबळेकर आणि कराडचे भूषण असणारे पी. डी. पाटील यांनी आपल्या अथक परिश्रमाने, नियोजनाने, जनसंपर्काने आणि एकमेकांच्या सहकार्याने या वाचनालयाचे हे बालरूप अक्षरशः बदलून टाकले.[२]

चावडी चौकातल्या पडक्या इमारतीमधून हे वाचनालय सन १९५२ नंतर नगरपालिकेने रविवार पेठेतील पाण्याच्या टाकीखालच्या त्यावेळच्या पालिका कार्यालयात आणले आणि त्या इमारतीतच सन १९६२ पर्यंत हे बाळ १४० वर्गणीदार, १४ दैनिके, १५ साप्ताहिके, ५ पाक्षिके आणि ३४ मासिकांचा आधार घेवून रांगू लागले.[३]

यानंतर मात्र कसल्याही परिस्थितीत कराड शहराची गरज असणा—या या वाचनालयाच्या प्रगतीत आणि नियोजनात वाढ करण्याचे मनावर घेवूनच पी. डी. पाटील यांनी एक सविस्तर योजना आखली. सकाळचे बातमीदार ना. वा. ढवळे आणि आर. पी. कुलकर्णी यांच्यावर अनुक्रमे या योजनेची जबाबदारी देण्यात आली.[४] यानंतर सन १९६३ मध्ये प्रथमच पालिकेच्या मुख्य इमारतीच्या माडीवरील विंगमध्ये हे ग्रंथालय हलविण्यात आले आणि या ग्रंथालयाला ही नवीन जागा फारच मानवली. कारण यानंतर ग्रंथालयाच्या प्रगतीने विलक्षण वेग घेतला. सन १९६२ मध्ये १४० वर्गणीदार असलेल्या ग्रंथालयाच्या वर्गणीदारांची संख्या सन १९७१ मध्ये ७४९ झाली. तर १७ हजार ६३९ ग्रंथ जमा झाले. परिणामी ग्रंथालय संचलनालयामार्फत नगरपालिकेच्या या ग्रंथालयास गौरव प्रदान करण्यात आला. काही अनुदानसुध्दा मंजूर करण्यात आले. बाल्यावस्थेतील ग्रंथालय मोठे झाले. मान मिळवू लागले. सन १९७१ पर्यंत या ग्रंथालयाने ९ संशोधकांना पीएच. डी. पदवी मिळवून देण्यास मदत केली.[५] सद्या स्पर्धा परीक्षेकरिता बसलेल्या विद्यार्थ्यांना या ग्रंथालयाचे मार्गदर्शन लाभत आहे.

ग्रंथालय शास्त्राप्रमाणे पुस्तकांचे डयुई दशांश पध्दतीने वर्गीकरण आणि ए. एल. कॅटलॉग कोड पध्दतीने तालिकीकरण केलेले हे महाराष्ट्रातील पहिले सार्वजनिक ग्रंथालय आहे.

सन १९७१ ते १९८५ हा काळ ग्रंथालयाचा झपाटयाने प्रगतीचा काळ होता. सन १९७१ मध्ये असलेली १७ हजार ६३९ ग्रंथसंख्या १९८५ मध्ये ४५८७५ एवढी झाली. ७४९ वर्गणीदारांचे ३ हजार ४८१ वर्गणीदार झाले. सन १९८५ अखेर ११ लाख किमतीची पुस्तके ग्रंथालयाने संभाळून व्यवस्थित जतन करून ठेवली आहेत.[६] आता वाचनालयाचा विस्तार वाढला, व्याप वाढला. पुस्तके, वर्गणीदार सा—यांचीच संख्या झपाटयाने वाढत गेली. नंतर ही जुनी जागासुध्दा वाचनालयाला अपुरी पडू लागली आणि आता मात्र ग्रंथालयाला हक्काचे चांगले प्रशस्त मजबूत घर देण्याचा निर्णय नगराध्यक्ष मा. पी. डी. पाटील व त्यांच्या सहका—यांनी घेतला आणि सन १९८७ साली यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन या कराडच्या भव्यदिव्य आणि पवित्र वास्तूचे उद्घाटन झाले. वाचनालयास या इमारतीमधील ३५'x२५' फूटांची चार हक्कांची दालने देण्यात आली.[७] आणि आजतागायत कराड नगरवाचनालय आपला प्रचंड खजिना संभाळत कराड वासियांच्या आणि अवघ्या महाराष्ट्राच्या वाचक, वक्ते, अभ्यासू आणि जिज्ञासूंच्या उपयोगी पडत आहे.

पुस्तकांचा खजिना संभाळत उभी असलेली स्वच्छ कपाटे, ग्रंथस्टॉक रूम, स्वतंत्र महिला विभाग, वर्तमानपत्रे विभाग, संशोधक अभ्यासिका विभाग, बाल विभाग, मासिक विभाग, ग्रंथालय कमिटीसाठी स्वतंत्र सभागृह, दोन गेस्ट रूम असे सारे कक्ष सामावून घेवून वाचनालय आज खंबीरपणे उभे आहे.

सन १९७१ च्या पुरस्कारानंतर परत सन १९८८—८९ मध्ये महाराष्ट्र शासनाचा "डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार" या "अ" दर्जा पुरस्कार रूपये १५,०००/— दि. १४ एप्रिल १९८८ रोजी मिळाला. वाचनालयाने मिळवलेला आहे.[८] आता वाचनालय फक्त मासिके, ग्रंथ, पुस्तके यातच अडकून पडलेले नाही. वाङ्:मयीन चळवळीसाठी पुस्तकवेडया वाचकांसाठी एक व्यासपीठ खुले करण्याचे नियोजन या वाचनालयातर्फे करण्यात आले आणि यातूनच शारदीय व्याख्यानमाला, यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला प्रतिवर्षी आयोजित करण्यात येवू लागलया . ग्रंथालयाकडे सद्या ७ संगणक असून ग्रंथालयाकडील सर्व पुस्तकांची डाटा एंट्री झाली आहे. त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षेकरिता बसलेल्या विद्यार्थ्यांना मोफत इंटरनेट सेवा व इतर विद्यार्थ्यांना प्रति तास रू. १०/— प्रमाणे सेवा देण्यात येत आहे.

नगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या हुतात्मा स्मारक येथे नगरपालिका नगरवाचनालयामार्फत दैनिके ठेवून विभाग सुरू केला आहे. सदर कामासाठी तेथे एका शिपायाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सन १९३२ सालापासून कराडमध्ये नवरात्र उत्सवात "शारदीय व्याख्यानमालेची" सुरूवात झाली.[९] सन १९७२ सालापासून "साने गुरूजी कथामाला" डिसेंबर मध्ये आयोजित करून प्रतिवर्षी चालविण्यात येते. यामध्ये साने गुरूजींच्या गोष्टी, कथा, अभिनय, गीते, बडबड गीते, नाटय प्रवेश यातून मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळत गेला. दि. १२ मार्च १९७३ पासून कराडमध्ये "यशवंत विचार" जागृत रहावा म्हणून यशवंतरावांच्या जयंती दिना निमित्त "यशवंतराव चव्हाण" व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते.[१०]

त्याबरोबरच संस्कृतचे, गाढे अभ्यासक व कराडचे पहिले खासदार वकील स्व. दादासाहेब आळतेकर यांचे नावे व्याख्यानमाला सातत्याने आयोजित केल्या जातात. वरील सर्व व्याख्यानमालांच्या रूपाने कराडचा इतिहास आणि संस्कृती जागती ठेवण्याचे प्रयत्न केले गेले. कै. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेतील व्याख्याने पुस्तक रूपाने प्रकाशित केली जातात. अशी आत्तापर्यंत १३ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्याचप्रमाणे दि. १७ जानेवारी २०१० रोजी कराड नगरपालिका वाचनालय व कराड तालुका ग्रंथालय संघाच्या संयुक्त विद्यमाने सातारा जिल्हयाचे ३७ वे अधिवेशन यशस्वी पार पडले. यामध्ये सातारा जिल्हयातील ग्रंथालयाचे पदाधिकारी, ग्रंथपाल, अध्यक्ष इ. लोक उपस्थित होते. या अधिवेशनात ग्रंथालयांच्या कामकाजाबाबत चर्चा, परिसंवाद, कार्यशाळा आयोजित केली होती. तसेच ग्रंथालयांच्या अनुषंगाने १३ ठराव पास केले आहेत.

आजअखेर या वाचनालयात ग्रंथांची संख्या ६२,००० आहे. नियतकालिके २८७ आहेत. रोज येणा—या दैनिकांची संख्या २२ असून १७ साप्ताहिके, ५ पाक्षिके, ७२ मासिके, ८ दैनिके व त्रै मासिके आणि १६३ वार्षिके या वाचनालयात येत असतात. कलकत्त्याच्या राजा राममोहन रॉय ग्रंथ प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी मिळणा—या ७० ते ८० पुस्तकांच्याद्वारे वाचनालयाने साखळी योजनाही चालू केली आहे. वाचनालयात सन १९०३ पासूनचे अंक १५० वर्षापूर्वीची जुनी पंचांगे, सन १९३८ पासूनचे कल्याण मासिकाचे अंक, काव्य रत्नावलीचे सर्व अंकसुध्दा इथे जतन करून ठेवलेले आहेत. या वाचनालयामध्ये सद्या ४३ बाल विभाग सभासद, १८८ अ वर्ग सभासद (२ पुस्तके) ३,०३३ सभासद ब वर्ग (१ पुस्तक), ३११ मासिकांचे सभासद असे एकूण ३,५६५ वर्गणीदार सभासद आहेत.[११]

वाचनालयाच्या या सा—या प्रगतीमध्ये पूर्वी झटलेल्या अनेक थोर लोकांच्याबरोबर कराड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा मा. सौ. उमा उदय हिंगमिरे, उपनगराध्यक्ष व शिक्षण समिती सभापती मा. श्री. राजेंद्र आत्माराम यादव, लोकशाही आघाडीचे अध्यक्ष मा. श्री. सुभाष पांडूरंग पाटील, मुख्याधिकारी मा. श्री. प्रशांत म. रोडे सर्व नगरसेवकांचे सहकार्य या वाचनालयास लाभत आहे.

कराडचे हे वाचनालय कराडचा पवित्र, भव्य आणि मानाचा इतिहास जपणारे एक महत्वपूर्ण स्थान आहे.

कराड शहर गजबजलेलया, दुमदुमलेलया, इमारतींनी आकाशात टेकलेलं, कारंजाच्या बागा, स्टेडिअम, देऊळ आणि दर्गा असलेलया शहरात कराड नगरवाचनालयाने सुध्दा कराडचे शहरपण खुलून आहे, फुलून आहे.

या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती इ. भाषेतील पुस्तके आहेत.

त्याप्रमाणे सन १८६० पासूनचे जुने ग्रंथ पहावयास आहेत. या ग्रंथामध्ये रसायनसार, महाराष्ट्र सांस्कृतिक, लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख, निबंधमाला (१९१७), धर्मसिंधु — प्राकृत भाषांतरासहीत, प्रणवप्रकाश (१९९७), मेदिनिय किंवा राष्ट्रीय ज्योतिष (१९१६) सचित्र भारत प्रवास, पंढरी वर्णन (१९०१), हिंदुस्थानचे वर्णन, नेटिव्ह राजाचा इतिहास व ब्रिटीश राज्य व्यवस्था (१८६०), तैतिरियोपनित्सटीक (१८८९), आत्मपुराण (१९१३), स्वराज्याची मोहिम (१९१४), गृहसाधनांची कोष्टके (१८६०) इ. अनेक पुस्तके उपलब्ध आहेत.[१२]

कराड नगरपालिका नगरवाचनालयाकडील जे वाचक सभासद महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत तसेच निवड समिती मार्फत विविध स्पर्धा परीक्षेमध्ये नगर वाचनालयाकडे असलेल्या स्पर्धा परीक्षांच्या पुस्तकांमुळे व उपलब्ध असलेल्या इंटरनेट सेवेमुळे यशस्वी झालेले आहेत त्यांची नांवे पुढीलप्रमाणे

१. श्री. सागर विनायक बोलके, कराड
सन २०१२—२०१३ या वर्षात जिल्हा परिषद, सातारा यांचे मार्फत घेण्यात आलेल्या विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या परीक्षेत सागर विनायक बोलके याची ''विस्तार अधिकारी'' या पदावर निवड झाली आहे.
२. श्री. प्रमोद लक्ष्मण साठे, शेवाळेवाडी
सन २०१२—२०१३ मध्ये जिल्हा निवड समिती, सांगली यांचेमार्फत घेण्यात आलेल्या ''तलाठी'' या परीक्षेत प्रमोद लक्ष्मण साठे याची ''तलाठी'' या पदावर निवड झाली आहे.
३. कु. सुवर्णा दिलीप बागल, मलकापूर
सन २०१२—२०१३ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या ''विक्रीकर निरीक्षक'' या परीक्षेत कु. सुवर्णा दिलीप बागल हिची ''विक्रीकरण निरीक्षक'' या पदावर निवड झाली आहे.
४. श्री. सुनिल शंकर पवार, मु. पो. चचेगांव, ता. कराड
महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत १५ जानेवारी २०१२ मध्ये घेतलेल्या ''सहाय्यक संचालक रोजगार व स्वयंरोजगार''—गट अ पदी निवड झालेली आहे. या परीक्षेमध्ये महाराष्ट्र राज्यात ७ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत.
५. श्री. विक्रम लालासो शिंदे, मु. पो. कासेगांव, ता. कराड
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नोव्हेंबर सन २०११ मध्ये घेतलेल्या ''मंत्रालय सहाय्यक परीक्षा २०११''—गट ब या पदासाठी निवड झालेली आहे. डॉ. विक्रम शिंदे हे ४५० पैकी ३२६ मार्क्स मिळवून राज्यात ३३ वे आलेले आहेत.
६. श्री. अभिषेक अशोक दुधगांवकर, शनिवार पेठ
महाराष्ट्र लोकसेवा आयोगार्फत घेण्यात आलेल्या सरळ सेवा भरतीच्या परीक्षेतून ''संशोधन सांख्यिकी अधिकारी''—गट ब या पदासाठी निवड
७. श्री. महेश्वर नारायण बडेकर, शनिवार पेठ, कराड
सातारा जिल्हा निवड समितीद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्याअंतर्गत असणा—या महसूल व वन विभागाकरिता घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेमधून ''भूमी संपादन कार्यालय, सातारा'' येथे लिपिक या पदावर निवड.
८. श्री. गणेश हरी मुळे, गजानन हौसिंग सोसायटी, सैदापूर
महावितरण कंपनीच्या परीक्षेत अप्पर डिव्हिजन क्लार्क (अकौंट) विभागामध्ये निवड.[१३]

**संदर्भ**

१. पाटील पी. डी. — संपादक, 'कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृतिग्रंथ' सन १९५५—१९५५, २९ डिसेंबर १९५५, पृष्ठ क्र. १०५.
२. प्रभुणे रा. गो. — संपादक, 'सेतू', १७ सप्टेंबर २००९, पृष्ठ क्र. ९९.
३. 'दैनिक सकाळ', कोल्हापूर — शनिवार १० ऑक्टोंबर, १९९२.
४. प्रभूणे रा. गो. — उपरोक्त, पृष्ठ क्र. ५३.
५. 'दैनिक सकाळ', कोल्हापूर — दिनांक १३ एप्रिल, १९८८.
६. नगरपालिका नगरवाचनालय, प्रेसनोट, १९८६, पृ. क्र. ४.
७. प्रभुणे रा. गो., उपरोक्त, पृ. क्र. ७३.
८. 'दैनिक लोकसत्ता', पुणे — ९ एप्रिल, १९८८.
९. कराड न गरपालिका नगरवाचनालय — शारदीय व्याख्यानमाला पत्रिका, १९३२ ते १९९३.
१०. यशवंत विचार — कराड नगरपालिका रेकॉर्ड—मिटींग वृत्तांत, १४ सप्टेंबर, १९९३.
११. 'दैनिक नवशक्ती', मुंबई — १४ एप्रिल, १९८८.
१२. 'दैनिक ऐक्य', सातारा — १३ एप्रिल, १९८८.
१३. कराड नगरपालिका रेकॉर्ड — ज. प्रो. २०१० ते २०१३.